IIP
IIPIMRJ
International Multidisciplinary Research Journal

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# पंडिता रमाबाई यांचे सामाजिक कार्य

**साईप्रसाद प्रमोद कुंभकर्ण**
सहाय्यक प्राध्यापक,
पद्मश्री विखे पाटील कला ,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय लोणी.

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***
*पंडिता रमाबाई*

**ABSTRACT**

पंडिता रमाबाई या भारतातील सामाजिक क्रांतीकारक, शिक्षणतज्ज्ञ आणि महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या समाजसुधारक होत्या. त्यांनी 19 व्या शतकातील पारंपरिक समाजव्यवस्थेतून स्त्रियांना शिक्षण व स्वावलंबनाचा मार्ग दाखवला.19 साव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात स्त्रियांच्या विशेषतः परित्यक्ता, पतिता व विधवांच्या उध्दारासाठी समर्पित भावनेने काम केलेल्या महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक म्हणजे पंडिता रमाबाई होय. अनेक संकटावर मात करुन आपण स्विकारलेल्या कार्याशी त्या एकनिष्ठ राहिल्या. त्यामुळेच महाराष्ट्रातील एक कर्तुत्ववान सुधारक म्हणून त्या परिचीत आहेत. सदर शोधनिबंधात पंडिता रमाबाई यांच्या समाजपरिवर्तनाच्या कार्याचा आढावा घेत आहोत.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Kumbhakarn, S. P. (2026).** पंडिता रमाबाई यांचे सामाजिक कार्य. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 801–804.*

**प्रस्तावना :**

पंडिता रमाबाई या भारतातील सामाजिक क्रांतीकारक, शिक्षणतज्ज्ञ आणि महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या समाजसुधारक होत्या. त्यांनी 19 व्या शतकातील पारंपरिक समाजव्यवस्थेतून स्त्रियांना शिक्षण व स्वावलंबनाचा मार्ग दाखवला.19 साव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात स्त्रियांच्या विशेषतः परित्यक्ता, पतिता व विधवांच्या उध्दारासाठी समर्पित भावनेने काम केलेल्या महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक म्हणजे पंडिता रमाबाई होय. अनेक संकटावर मात करुन आपण स्विकारलेल्या कार्याशी त्या एकनिष्ठ राहिल्या. त्यामुळेच महाराष्ट्रातील एक कर्तुत्ववान सुधारक म्हणून त्या परिचीत आहेत. सदर शोधनिबंधात पंडिता रमाबाई यांच्या समाजपरिवर्तनाच्या कार्याचा आढावा घेत आहोत.

**उदिष्ट :-**

1. 18 व्या शतकातील स्त्री जीवनाविषयी माहिती जाणून घेणे.
2. पंडिता रमाबाई यांच्या कार्याचा आढावा घेणे.
3. आर्य महिला समाज व रमाबाई असासिएशनच्या स्थापनेमागील प्रेरणा जाणून घेणे.
4. प्रस्तापित सनातनी समाजाचा पंडिता रमाबाईच्या जीवनावर झालेला परिणाम अभ्यासणे.

**गृहितके :-**

1) पंडिता रमाबाई यांचे सामाजिक कार्य समजावून घेणे
2) पंडिता रमाबाई यांचे स्त्रीशिक्षण आणि सामाजिक सुधारणा अभ्यासणे.

**पंडिता रमाबाईचे पुर्व चरित्र :-**

पंडीता रमाबाईंचा जन्म 23 एप्रिल 1858 रोजी कर्नाटकातील मंगरुळजवळ असलेल्या गंगामुळ येथे झाला. त्यांचे वडील अनंतशास्त्री डोंगरे संस्कृत भाषापंडीत होते. त्यांनी आपल्या पत्नीला व मुलीला संस्कृत शिकविले. म्हणून ज्ञानीबांधवानी त्यांनी वाळीत टाकले. त्यामुळे त्यांनी गाव सोडले. अनंत शास्त्रींनी रमाबाई व मुलगा श्रीनिवास यांना संस्कृत, व्याकरण, रामायण, आणि सिध्दांत कौमुदी अमरकोष इ. ग्रंथ समजून सांगितले. 1875-76 च्या दरम्यान भयंकर दुष्काळात रमाबाईच्या आईवडीलांचे निधन झाले. रमाबाई व श्रीनिवास कलकत्यास पोहचले. तेथे त्यांच्या विरतेचा व बुध्दीमत्तेचा गौरव करण्यात आला. 1880 मध्ये विदवान पंडीत समाजसुधारक यांच्या सिनेट हॉलमधील सभेत त्यांना पंडीता व सरस्वती या पदव्या देण्यात आल्या आणि रमाबाई पंडीता रमाबाई म्हणून भारतभर प्रसिध्द झाल्या.

**आर्य महिला समाजाची स्थापना :-**

काही कालावधीनंतर रमाबाई पुण्यास पोहचल्या. न्या. म.गो. रानडे, डॉ. भाडारकर, वामन आबाजी मोडक यांच्या सहकार्याने त्यांनी "आर्य महिला समाजाची स्थापना केली. त्यानंतर अहमदनगर, ठाणे, सोलापूर, मुंबई, पंढरपूर बाही इ. ठिकाणी आर्य महिला समाजाची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून बालविवाह, पुर्नविवाहास बंदी, स्त्री शिक्षणास बंदी अशा अनेक चालीरिती आणि अनिष्ठ रुढी विरुध्द आवाज उठविला. भारतीय स्त्रीयांची अवस्था आणि त्यात बदल करण्याच्या हेतूने त्यांनी "स्त्री धर्मनिती" हे पुस्तक लिहिले.

**हंटर कमिशन पुढील साक्ष :-**

पंडीता रमाबाईनी आर्य समाजाच्या वतीने भारतात आलेल्या हंटर कमिशनच्या स्वागतपर भाषणात भारतीय स्त्रीयांच्या दुरावस्थेचे वर्णन केले. त्यांनी हंटर कमिशनपुढे साक्ष दिली आणि त्यात पुढील मागण्या केल्या.

1) मुलींना राहण्यासाठी सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज अशी वसतिगृहे असावीत.
2) मुलांच्या शाळेतील शिक्षकांपेक्षा मुलींच्या शाळेतील अध्यापिकांना जास्त पगार द्यावा.
3) मुलींच्या शाळा स्त्री-अन्स्पेक्टरांनीच तपासाव्यात.
4) हिंदुस्थानात असलेली स्त्री डॉक्टरांची कमतरता दूर करावी.
5) स्त्रियांना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या दिल्या जाव्यात.

हंटर कमिशन पंडीता रमाबाईच्या विचारांनी प्रभावित झाले. ते महाराणी व्हिक्टोरियांनी वाचल्यानंतर स्त्रियांसाठी दवाखाने

वैद्यकिय शिक्षण इ. सोयी करण्या बाबत प्रत्यक्ष निर्णय घेतले.

**इंग्लंड येथे खिश्चन धर्माचा स्विकार :-**

आपले स्त्रीजीवन सुधारणेचे कार्य प्रभाविपणे करता यावे यासाठी रमाबाईनी इंग्लडला जाण्याचा निर्णय घेतला. त्या 17 मे 1883 आपल्या मुलीसोबत इंग्लडला पोहोचल्या. इंग्लंडमध्ये बॉटिज गावच्या सेंट मेरी या मठात त्या राहिल्या. तेथील शिक्षणाच्या कालखंडात येशू ख्रिस्तांच्या पतित स्त्रियांविषयीच्या दृष्टिकोनामुळे तसेच भूतदया आणि प्रेमाच्या शिकवणूकीमुळे त्या खिश्चन धर्माकडे आकर्षित झाल्या. त्यामुळे 29 सप्टेंबर 1883 रोजी बॉटिज येथील चर्चमध्ये त्यांनी खिश्चन धर्माचा स्विकार केला.

**अमेरिकेतील कार्य:-**

दोन वर्ष त्यांनी इंग्लडमध्ये संस्कृतच्या अध्यापनाचे कार्य केले. 17 फेब्रुवारी 1886 रोजी पंडीता रमाबाईनी इंग्लड सोडले. व 6 मार्च 1886 रोजी त्या अमेरिकेत पोहचल्या. अमेरिकेत असताना त्यांनी "बालोद्यान शिक्षण पद्धतीचा अभ्यास केला. तेथील वास्तव्यात हिंदुस्थानातील बालविधवांच्या प्रश्नांची चर्चा करणारे 'द हाय कास्ट हिंदू वुमन' हे इंग्रजी पुस्तक लिहिले तसेच "युनायटेड स्टेट्स ची लोकस्थिती व प्रवासवृत्त ही पुस्तक प्रसिध्द केली भारता प्रमाणेच इंग्लड अमेरिकतही त्यांच्या विद्वत्तेचा प्रसार झाला.

**रमाबाई असोशिएशनची स्थापना:-**

अमेरिकेत त्यांनी स्त्रियांच्या भारतातील परिस्थितीवर खूप व्याख्याने दिली बालविधवांच्या प्रश्नांची चर्चा केली. त्यामुळे अमेरिकेतील लोकांमध्ये भारतातील बालविधवांबद्दल कमालीची सहानुभूती निर्माण केली. त्यातूनच अमेरिकन समाजाने हिंदुस्थानात रमाबाईच्या बालविधवांच्या कार्यास मदत करण्यासाठी बॉस्टन येथे रमाबाई असोशिएशन नावाची संस्था स्थापन केली. व त्यांच्या कार्यासाठी पुढील 10 वर्षे त्यांना मदत करण्याचे आश्वासन दिले.

**शारदा सदनची स्थापना :**

फेब्रुवारी 1889 मध्ये रमाबाई अमेरिकेहून भारतात परत आल्या. आम्ही अमेरिकेत मिळालेले आर्थिक सहाय्य व रमाबाई असोसिएशनचे सहकार्याचे आश्वासन या आधारावर भारतात परत येताच 11मार्च 1889 रोजी त्यांनी मुंबई येथे 'बालविधवांसाठी" शारदा सदन" नावाची संस्था स्थापन केली. या सदनात निराश्रित विधवा व अनाथ स्त्रिया यांच्या राहण्या व जेवणाची मोफत व्यवस्था करण्यात आली होती. तसंच शिक्षणाचीही सोय केली होती.

**पंडीता रमाबाईची इतर कामे:-**

1) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या 5 व्या अधिवेशनात सहभाग इ.स. 1889 मध्ये मुंबईच्या कॉग्रेस अधिवेशनात पंडीता रमाबाईंचा सहभाग होता.

2) हिंदी राष्ट्रभाषेचा आग्रह "युनायटेड स्टेटसची लोकस्थिती व प्रवासवर्णन या ग्रँथात पंडीता रमाबाईनी हिंदी
राष्ट्रभाषा असावी असे आग्रहाने म्हटले आहे.

3) मद्यपान निषेधक स्त्री मंडळ अमेरिकेत असतानाच त्यांनी या चळवळीत भाग घेतला होता. अनेक भाषणे मद्यपान विरोधात दिली होती. या मंडळाच्या रमाबाई सक्रिय सहभागी होत्या.

पंडीता रमाबाईनी मुक्तिसदनाचे कार्यक्षेत्र वाढविण्यास सुरुवात केली. 'मुक्तिसदनात' निरागस विधवा स्त्रीयासाठी सोय केली होती. 'कृपासदन' 'प्रितीसदन' 'शारदासदन' या सधनांमध्ये निरनिराळ्या गटांच्या स्त्रियांना आश्रय दिला. पंडीता रमाबाईंना ब्रिटिश सरकारने 'कैसर ए-हिंद हा किताब दिला. अनाथ स्त्रीयांसाठी विरत कष्ट करणाऱ्या या स्त्रीचे वैयक्ति आयुष्य अत्यंत दुःखमय होते. त्यांच्या मुलीवर त्यांच्या कार्याचा प्रभाव पडला होता. आपले कार्य आपली मुलगी पुढे चालु ठेवील, अशी रमाबाईंना उमेद होती परंतू दुर्दवाने 1921 मध्ये मनोरमाचा मृत्यू झाला. इ.स. 1922 मध्ये केडगाव येथे रमाबाईचा मृत्यू झाला.

**निष्कर्ष :-**

1) 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय सामाजिक परिस्थितीत स्त्रीयांना कोणताही सामाजिक दर्जा नव्हता समाजात स्त्रीयांना शुद्रांच्या बरोबरीने स्थान होते अशा परिस्थीतीत रमाबाईचे शिक्षण परदेशातील स्त्री चळवळ, भारतीय विधवा स्त्रीयांच्या पुनर्वसनाचे कार्य वाखाणण्याजोगे आहे.

2) पंडिता रमाबाई यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी कार्य केले

3) पंडिता रमाबाई या उदारमतवादी विचारांच्या होत्या त्यांनी अनेक सामाजिक सुधारणा व स्त्री शिक्षणाविषयी कार्य केले.

**संदर्भ साधने :-**

1) कटारे अनिल, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 2000.

2) गाठाळ एस.एस, महाराष्ट्रातील समाजसुधारक विचारधारा व कार्य, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 2015.

3) ताटके नीलम, महाराष्ट्रातील समाजसुधारक, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2009.

4) पवार सचीन, महाराष्ट्रातील समाजसुधारक व व्यक्ती विशेष, रयत प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2020.

5) सोनवणे स्नेहल, आधुनिक महाराष्ट्र, सक्सेस पब्लिकेशन, पुणे, सुधारित आवृत्ती 2015.